**राज्यातील जिमखाना धोरणात आवश्यक बदल करण्याबाबत अभ्यासगटाची नेमणूक करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्र. जमीन-२५१२/०८/प्र.क्र.५१/ज-२,**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- १८ फेब्रुवारी, २०२६

<u>संदर्भ</u>:- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.एलबीएल २५०१/प्र.क्र.१७/ज-२ , दि.२२.०९.२००३.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-२५१२/०८/प्र.क्र.५१/ज-२, दि.२३.०६.२०१७.
३) महसूल व वन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.जमीन-२५१२/०८/प्र.क्र.५१/ज-२, दि.०४.१०.२०२४.
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.जमीन-२५१२/०८/प्र.क्र.५१/ज-२, दि.३०.०७.२०२५.

**प्रस्तावना:-**

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह राज्यामध्ये अनेक जिल्ह्यांमध्ये जिमखान्यांना भाडेपट्टयाने शासकीय जमीन प्रदान करण्यात आलेली आहे. बृहन्मुंबईसह राज्यभरात जिमखान्यांना भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींच्या भाडेपट्टा नुतनीकरणाचे एकत्रित सुधारीत धोरण दि.३०.०७.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आले आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यामध्ये भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील जिमखान्यांचा उपयोग सर्वसामान्य लोकांना होणे, जिमखान्याच्या कार्यपध्दतीत अधिक सुलभता आणणे, जिमखान्याकडून शासनास अधिक महसूल प्राप्त होणे, सभासद नियुक्ती बाबत अधिक पारदर्शकता आणणे इत्यादी बाबी विचारात घेवुन जिमखानाच्या धोरणात काळानुरुप आवश्यक बदल करण्याच्या अनुषंगाने व सद्यस्थितीत असलेल्या धोरणाचे पुनर्विलोकन करण्याच्या अनुषंगाने एका अभ्यासगटाची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यामध्ये भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील जिमखान्यांच्या धोरणात आवश्यक बदल करण्याबाबत विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे अभ्यासगट गठित करण्यात येत आहे:-

**अ) विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखालील समितीचे स्वरुप खालीलप्रमाणे आहे:-**

| **अ.क्** | **सदस्याचे नाव** | **समितीची रचना** |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त, कोकण | अध्यक्ष |
| २ | जिल्हाधिकारी, मुंबई शहर | सदस्य |
| ३ | जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर | सदस्य |
| ४ | श्रीम. मनिषा जायभाये, सह सचिव,<br>महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई | सदस्य |
| ५ | विभागीय आयुक्तांना आवश्यक वाटेल असा तज्ञ व्यक्ती | सदस्य |

**ब) समितीची कार्यकक्षा:-**

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यामध्ये भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील जिमखाने.

**क) समितीची कार्यपध्दती:-**

मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण राज्यामध्ये भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील जिमखान्यांचा अभ्यास करुन समितीने एक महिन्यात अहवाल/शिफारशी शासनास सादर कराव्यात.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०२१८१३०३०१५९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=637145FD393D6D5C713E94E6DA7BC6BEE23011448B7FC64D138630B9C76AE7A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2026.02.18 14:41:21 +05'30'

**(संजय औ.धारुरकर)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२

७) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई-३२
८) अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई-३२
९) अपर मुख्य सचिव (गृहनिर्माण विभाग) मंत्रालय, मुंबई-३२
१०) प्रधान सचिव व विधि परामर्शी (विधि व न्याय विभाग) मंत्रालय, मुंबई-३२
११) प्रधान सचिव (नगरविकास-१) मंत्रालय, मुंबई-३२
१२) सर्व मंत्रालयीन विभाग,
१३) सर्व महानगरपालिका आयुक्त
१४) सर्व विभागीय आयुक्त
१५) सर्व जिल्हाधिकारी
१६) नोंदणी महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे
१७) जमाबंदी आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे
१८) प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र (१), मुंबई/महाराष्ट्र (२) नागपूर
१९) प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा) महाराष्ट्र (१), मुंबई/महाराष्ट्र (२) नागपूर
२०) सर्व सह सचिव/उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२१) निवडनस्ती - कार्यासन/ज-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.